# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.
E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in

परिपत्रक

क्रमांक: २अ/एडीएम/२०१७/२०९५
दिनांक : 18 AUG 2017

**विषय :-** प्रथम वर्ष एम.ई./एम.टेक, एम.फार्मसी, एम.आर्किटेक्चर पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेशाचे रिपोर्टिंग करण्यासाठी दिनांक १९.८.२०१७ रोजी अतिरिक्त संधी देणेबाबत....

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता संचालनालयाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या एम.ई./एम.टेक, एम.फार्मसी, एम.आर्किटेक्चर पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी केंद्रीभूत प्रवेश फेरीच्या तिस-या फेरीत अलॉट झालेले प्रवेश खालीलप्रमाणे ३ मुद्दयांच्या अनुषंगाने संस्थांमध्ये प्रवेश निश्चित करता आलेला नाही अशा उमेदवारांच्या बाबतीत खाली नमूद केलयाप्रमाणे प्रवेश निश्चित करता येऊ शकेल.

१. जे उमेदवार केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या तिस-या प्रवेश फेरीत संस्थेत अॅलॉट झालेल्या प्रवेशाबाबत विहीत केलेले Seat Acceptance शुल्क भरले आहे तसेच एआरसी मध्ये रिपोर्ट केला आहे मात्र त्यांच्या अंतिम Allotment Institute Status नुसार दिनांक १८.८.२०१७ पर्यंत प्रत्यक्ष संस्थेत जाऊन प्रवेश निश्चित करू शकले नाहीत असे उमेदवार संबंधित संस्थेत जाऊन प्रवेश निश्चित करू शकतील.
२. जे उमेदवार केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या तिस-या प्रवेश फेरीत संस्थेत अॅलॉट झालेल्या प्रवेशाबाबत विहीत केलेले Seat Acceptance शुल्क भरले आहे मात्र एआरसी मध्ये रिपोर्ट केला नाही आणि त्यांच्या अंतिम Allotment Institute Status नुसार दिनांक १८.८.२०१७ पर्यंत प्रत्यक्ष संस्थेत जाऊन प्रवेश निश्चित करू शकले नाहीत असे उमेदवार संबंधित संस्थेत जाऊन प्रवेश निश्चित करू शकतील.
३. जे उमेदवार केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या तिस-या प्रवेश फेरीत संस्थेत अॅलॉट झालेल्या प्रवेशाबाबत विहीत केलेले Seat Acceptance शुल्क भरले नाही आणि एआरसी मध्ये रिपोर्ट केला नाही असे उमेदवार संबंधित संस्थेत जाऊन प्रवेश निश्चित करू शकतील.
४. वरील क्रमांक ३ समोरील उमेदवारांच्या बाबतीत राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाकडून आकारण्यात येणारे रुपये १०००/-प्रोसेसिंग चार्जेस संस्थांनी आकारून ते एकत्रितरित्या राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाकडे विद्यार्थ्यांच्या नाव आणि अॅप्लीकेशन आय डी सह सादर करणे आवश्यक राहील.
५. अशा प्रकारे थेट संस्थेत जाऊन प्रवेश निश्चिती करण्यासाठी संधी दिनांक १९.८.२०१७ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत देण्यात येईल.

**( चंद्रशेखर ओक,** भा.प्र.से.)
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : मा.आयुक्त,राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना माहितीस्तव सादर
प्रत : कार्यासन अधिकारी, आय्.टी. सेल, तंत्रशिक्षण, मुख्य कार्यालय मुंबई यांना कळविण्यात येते की, वर नमूद केल्याप्रमाणे सूचना विदयार्थी व पालकांच्या माहितीकरीता संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात याव्यात.
प्रत : सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती,नागपूर तसेच त्यांच्या अधिनस्त येणा-या सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी